दोषारोप क्र. २:-श्री. पांडुरंग सदाशिव शिंदे, तुरूंगाधिकारी श्रेणी-२, मुंबई मध्यवर्ती कारागृह व न्यायविभाग येथे कार्यरत होते. दक्षिण विभाग, मुंबई या व्हॉटसअॅप ग्रुपवर कारागृहातील काही अधिकारी व कर्मचारी कारागृहातील अधीक्षक व वरिष्ठ अधिकारी तसेच कारागृह प्रशासनावर धमकीवजा, अपमानास्पद पोस्ट करून इतर अधिकारी व कर्मचारी यांना भडकविण्याचा प्रयत्न करत आहेत. श्री. शिंदे, तु अ श्रेणी-२ यांची विधाने ही त्यांचे वैयक्तिक अभिव्यक्तीच्या मर्यादेत व नियमास अनुसरून असणे अभिप्रेत आहे. तसेच सार्वजनिक समाजमाध्यमांवर एखादी पोस्ट करताना त्यांचे नकारात्मक किंवा प्रक्षोभक प्रतिसाद पडण्याची शक्यता विचारात घेऊन विधान करणे आवश्यक आहे. परंतु श्री. शिंदे, तु अ श्रेणी-२ यांनी जहाल भाषेमध्ये पोस्ट करून इतर अधिकारी व कर्मचारी यांना भडकविण्याचा प्रयत्न केला आहे. श्री. शिंदे, त.अ. श्रेणी-२ यांनी सदर पोस्ट दक्षिण विभाग, मुंबई या ग्रुपवर त्यांचा मोबाईल क्र. ९०९६४०११५५ या क्रमांकावरून स्वतः केलेली आहे. अशा प्रकारे श्री. पांडुरंग सदाशिव शिंदे, तुरूंगाधिकारी श्रेणी-२ यांनी शासकीय सेवेत असताना कर्तव्यपारायणता न राखता अशोभनिय वर्तन केले आहे. यावरून त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) १९७९ चे नियम ३(१) (दोन) (तीन) चे उल्लंघन केले आहे.

(हर्षद अहिरराव),
अधीक्षक,
मुंबई मध्यवर्ती कारागृह,
मुंबई

E



Exh. E

sahpatr- 8

24

सत्यमेव जयते

दुरध्वनी क्र.022-23096998/23077372
गर्व्ह. मेल आयडी.-mumbaicp-mh@gov.in
मेल आयडी – mcpsupdt@gmail.com

गृह विभाग,
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा

मुंबई मध्यवर्ती कारागृह,मंबई
मुंबई - 400011 (महाराष्ट्र राज्य)

जा. क्र./मुंमका/गोवि/श्री. शिंदे, तु अ श्रेणी-२/का. दा. नोटीस/ 146 /२०२४, दि.२०.०३.२०२४

**कारणे दाखवा नोटीस**

वाचा:-१.मा. कारागृह उपमहानिरीक्षक, दक्षिण विभाग, भायखळा, मुंबई-८ यांचे आदेश पत्र जा. क्र. ०३/२०२४, दिनांक ०८.०१.२०२४.

२.या कार्यालयाचे ज्ञापन जा. क्र. १५/२०२४, दिनांक १५.०१.२०२४.

३.दिनांक २७.०१.२०२४ रोजी श्री. शिंदे, तु अ श्रेणी-२ यांना ज्ञापन क्र. १५/२४ या कार्यालयाचे ई-मेलव्दारे अदा.

४.दिनांक १६.०३.२०२४ रोजी श्री. शिंदे, तु अ श्रेणी-२ यांना मुदतवाढ पत्र १३८/२४, दिनांक १६.०३.२०२४ या कार्यालयाचे ई-मेलव्दारे अदा.

श्री. पांडुरंग सदाशिव शिंदे, तु अ श्रेणी-२, तत्का. मुंबई मध्यवर्ती कारागृह, मुंबई सध्या सिंधुदुर्ग जिल्हा कारागृह हे मुंबई मध्यवर्ती कारागृह येथे कार्यरत असताना समाजप्रसार माध्यमांवर वरिष्ठ अधिकारी, अधीक्षक व इतर अधिकारी यांचेविरूध्द अवमानकारक पोस्ट करून गैरवर्तन केल्याप्रकरणी त्यांची मा. मुख्यालयाचे आदेश पत्र जा. क्र. ५३/२०२३, दिनांक १७.११.२०२३ आदेशान्वये मा. कारागृह उपमहानिरीक्षक, दक्षिण विभाग, भायखळा, मुंबई यांनी दिनांक २३.११.२०२३ रोजी त्यांचे कार्यालयात सदर प्रकरणी चौकशी करून मा. मुख्यालयास अहवाल सादर करण्यात आलेला होता. मा. उपमुख्यालयाचे संदर्भीय आदेश क्र. १ अन्वये सदर प्रकरणी श्री. पांडुरंग सदाशिव शिंदे, तु अ श्रेणी-२ यांची चौकशीमध्ये कसुरी सिध्द झाल्याने त्यांचेविरूध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) १९७९ मधील नियम १० नुसार दोषारोप देवून कडक कारवाई करणेबाबत आदेशीत करण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने या कार्यालयाचे संदर्भीय क्र. ०२ नुसार श्री. पांडुरंग सदाशिव शिंदे, तु अ श्रेणी-२ यांचेविरूध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम १० अन्वये शिस्तभंगविषयक कारवाई करीता दोषारोप काढण्यात आले होते. सदर दोषारोप श्री. पांडुरंग सदाशिव शिंदे, तु अ श्रेणी-२ यांना दिनांक २७.०१.२०२४ रोजी या कार्यालयाचे ई-मेलव्दारे बजावण्यात आले होते. त्यानंतर श्री. पांडुरंग सदाशिव शिंदे, तु अ श्रेणी-२ यांना दिनांक दोषारोपचे अभिवेदन सादर करण्याकरीता या कार्यालयाचे संदर्भीय पत्र क्र. ४ अन्वये तीन (३)

T.C.

25

दिवसाची मुदतवाढ देण्यात आली होती. परंतू श्री. पांडुरंग सदाशिव शिंदे, तु अ श्रेणी-२ यांनी दिलेल्या मुदतीमध्ये या कार्यालयास स्पष्टीकरण सादर केलेले नाही.

**श्री. पांडुरंग सदाशिव शिंदे, तु अ श्रेणी-२ यांचेवर खालीलप्रमाणे दोन दोषारोप ठेवण्यात आले होते.**

**दोषारोप क्र. १**:- श्री. पांडुरंग सदाशिव शिंदे, तुरूंगाधिकारी श्रेणी-२, मुंबई मध्यवर्ती कारागृह हे न्यायविभाग येथे कार्यरत होते. मा. मुख्यालयाचे आदेशान्वये समाजप्रसार माध्यमांवर प्रसारित केलेली अवमानकारक पोस्ट प्रकरणी मा. उपमुख्यालय येथे चौकशी करण्यात आली आहे. सदर चौकशी अन्वये श्री. शिंदे, तु अ श्रेणी-२ यांची कसुरी असल्याने त्यांचेविरूध्द नियम १० अन्वये कडक शिस्तभंगाची कारवाई करणेबाबत आदेशीत केले आहे. श्री. शिंदे, तु. अ. श्रेणी-२ यांनी दक्षिण विभाग, मुंबई या व्हॉटसअॅप ग्रुपवर श्री भोईटे, अधीक्षक व इतर साप्ताहिक न देणारे सर्व अधीक्षकांना श्री ठाकरे यांनी "हिम्मत नाही गुर्मी म्हणतात भावा याला" या पोस्टला श्री. शिंदे, तु अ श्रेणी-२ यांनी "काहींना गुर्मी नाही.... माज आलेला असतो. आणि तोच माज डोक्यात गेला की जे वर्तन घडतं त्याला मस्ती म्हणतात. भिकार्लेपणात अचानक हरामचं घबाड खायला मिळालं की जो येतो ना त्याला माज म्हणतात" अशा प्रकारे वरिष्ठांच्या विरूध्दात अवमानकारक विधान केले असल्याचे दिसून येत आहे. श्री. शिंदे, तु. अ. श्रेणी-२ यांनी कारागृह नियमावली अधिनियमातील प्रकरण १३ मधील भाग दोन Rule 25 (vii) (Insubordination or insolence to any Officer superior to him) चे उल्लंघन केल्याचे स्पष्ट होत आहे. शिंदे, त.अ. श्रेणी-२ यांनी सदर पोस्ट दक्षिण विभाग, मुंबई या ग्रुपवर त्यांचा मोबाईल क्र. ९०९६४०११५५ या क्रमांकावरून स्वतः केलेली असल्याचे चौकशीमध्ये मान्य केले आहे. अशा प्रकारे श्री. पांडुरंग सदाशिव शिंदे, तुरूंगाधिकारी श्रेणी-२ यांनी शासकीय सेवेत सचोटी राखलेली नाही. यावरून त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) १९७९ चे नियम ३(१) (एक) चे उल्लंघन केले आहे.

**दोषारोप क्र. २**:-श्री. पांडुरंग सदाशिव शिंदे, तुरूंगाधिकारी श्रेणी-२, मुंबई मध्यवर्ती कारागृह हे न्यायविभाग येथे कार्यरत होते. दक्षिण विभाग, मुंबई या व्हॉटसअॅप ग्रुपवर कारागृहातील काही अधिकारी व कर्मचारी कारागृहातील अधीक्षक व वरिष्ठ अधिकारी तसेच कारागृह प्रशासनावर धमकीवजा, अपमानास्पद पोस्ट करून इतर अधिकारी व कर्मचारी यांना भडकविण्याचा प्रयत्न करत आहेत. श्री. शिंदे, तु अ श्रेणी-२ यांची विधाने ही त्याचे वैयक्तिक अभिव्यक्तीच्या मर्यादेत व नियमास अनुसरून असणे अभिप्रेत आहे. तसेच सार्वजनिक समाजमाध्यमांवर एखादी पोस्ट करताना त्यांचे नकारात्मक किंवा प्रक्षोभक प्रतिसाद पडण्याची शक्यता विचारात घेऊन विधाने करणे आवश्यक आहे. परंतू श्री. शिंदे, तु अ श्रेणी-२ यांनी जहाल भाषेमध्ये पोस्ट करून इतर अधिकारी व कर्मचारी यांना भडकविण्याचा प्रयत्न केला आहे. श्री. शिंदे, त.अ. श्रेणी-२ यांनी सदर पोस्ट दक्षिण विभाग, मुंबई या ग्रुपवर त्यांचा मोबाईल क्र. ९०९६४०११५५ या क्रमांकावरून स्वतः केलेली आहे. अशा प्रकारे श्री. पांडुरंग सदाशिव शिंदे, तुरूंगाधिकारी श्रेणी-२ यांनी शासकीय सेवेत असतना कर्तव्यपारायणता न राखता अशोभनिय वर्तन केले आहे. यावरून त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) १९७९ चे नियम ३(१) (दोन) (तीन) चे उल्लंघन केले आहे.

26

**दोन्ही दोषारोपमध्ये श्री. पांडुरंग सदाशिव शिंदे, तु अ श्रेणी-२ यांना अभिवेदन सादर करण्यासाठी दहा (१०) दिवस मुदत देण्यात आली होती. त्यानंतर पुन्हा तीन (०३) दिवस मुदतवाढ देण्यात आली होती. परंतू श्री. पांडुरंग सदाशिव शिंदे, तु अ श्रेणी-२ यांनी अभिवेदन सादर करण्याकरीता दिलेल्या विहीत मुदतीमध्ये या कार्यालयास कोणत्याही प्रकारे अभिवेदन सादर केलेले नाही.**

करीता, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम ३ मधील १ (एक) (दोन) (तीन) चे उल्लंघन केलेले आहे. त्याकरीता महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ५ मधील तरतुदीनुसार तुमचे सदरचे गैरवर्तन हे कारागृह विभागाचे गणवेशधारी शिस्तीवर परिणाम करणारे व अशोभनीय आहे. त्याकरीता तीन (०३) वर्षे वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम न होता का स्थगित करण्यात येऊ नये? याबाबत तुमचे स्पष्टीकरण १० दिवसाचे आत या कार्यालयास सादर करावे अन्यथा तुम्हास याबाबत काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरून पुढील कारवाई एकतर्फी करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**(हर्षद अहिरराव)**
अधीक्षक,
मुंबई मध्यवर्ती कारागृह,
मुंबई

प्रति,

श्री. पांडुरंग सदाशिव शिंदे,
तुरूंगाधिकारी श्रेणी-२,
तत्का. मुंबई मध्यवर्ती कारागृह, मुंबई.

प्रत:-१.अधीक्षक, सिंधुदुर्ग जिल्हा कारागृह यांना माहितीस्तव व कार्यवाहीस्तव रवाना.

२/-यांना कळविण्यात येते की, सदर कारणे दाखवा नोटीस श्री. पांडुरंग सदाशिव शिंदे, तु अ श्रेणी-२ यांना अदा करण्यात यावी व ज्यादा प्रतीवर स्वाक्षरी घेऊन पोच या कार्यालयास पाठविण्यात यावी.

EXL-F

27

दिनांक – 18.04.2024

पांडुरंग सदाशिव शिंदे
तुरुंग अधिकारी श्रेणी-2
मुंबई मध्यवर्ती कारागृह,
मुंबई.

प्रति,

मा. अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य,
पुणे-1.

**विषय :- शिक्षा आदेशाविरुद्ध अपील सादर करणेबाबत ..**

**संदर्भ :-** 1. मा. अधीक्षक,मुंबई मध्यवर्ती कारागृह यांचेकडील दि. 15.01.2024 रोजीचे ज्ञापन क्र.15/2024 **( मेलद्वारे प्राप्त दि. 27.01.2024 रोजी )**

2. मा.अधीक्षक,मुंबई मध्यवर्ती कारागृह यांचेकडील दि. 12.04.2024 रोजीचे शिक्षा आदेश क्र.156/2024 **( मेलद्वारे प्राप्त दि. 12.04.2024 रोजी )**

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरून सविनय सादर करतो की, मला मा. अधीक्षक,मुंबई मध्यवर्ती कारागृह,मुंबई यांनी **संदर्भ-1 (सहपत्र-1 ज्ञापन-दोषारोप अवलोकनार्थ जोडलेले आहे.)** अन्वये दोषारोपाची बजावणी करून संदर्भ-2 **(सहपत्र-2 शिक्षादेश अवलोकनार्थ जोडलेले आहे.)** अन्वये 03 वर्षे वेतनवाढी परिणामाशिवाय स्थगितीच्या शिक्षेचा आदेश निर्गमित केलेला आहे. दोषारोपांची बजावणी, शिक्षादेश निर्गमित करण्याच्या दरम्यान यापूर्वी व यादरम्यान कायद्याची योग्य प्रक्रिया आणि कायद्याने घालून दिलेल्या प्रक्रियेची अमलबजावणी झालेली नाही. त्याचप्रमाणे संदर्भीय प्रक्रियेदरम्यान कायद्याने घालून दिलेल्या अधिकारक्षेत्राचे मुक्तपणे उल्लंघन करून नियम व कायद्यांचा भंग करण्यात आलेला आहे. याबाबत निम्नप्रमाणे निवेदन सादर करीत आहे—

मा. कारागृह मुख्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेशाने माझी बदली मुंबई मध्यवर्ती कारागृह,मुंबई या आस्थापनेवरून सिंधुदुर्ग जिल्हा कारागृह या आस्थापनेवर झालेली आहे. सदर झालेल्या बदलीचा आदेश मला मान्य नसल्याकारणाने मी मा. मॅट कोर्ट, मुंबई या ठिकाणी O.A./80/2024 अन्वये याचिका दाखल करून त्याबाबत मा. न्यायालय यांचेकडे दाद मागितलेली आहे.

मी तुरुंग अधिकारी श्रेणी-2 या पदावर सरळसेवेने रुजू झालेलो असून सदर पद हे गट-ब आराजपत्रित या वर्गवारीमध्ये येते ( सोबत नियुक्ती आदेश अवलोकनार्थ **सहपत्र-3** जोडलेले आहेत). अधीक्षक, मुंबई मध्यवर्ती कारागृह हे पद कार्यालय प्रमुखाचे आहे. संदर्भीय शिक्षा आदेशाच्या अनुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील नियम,1979 मधील नियम -6 अवलोकनार्थ खालीलप्रमाणे उद्धृत करीत आहे.

T.C
F

28

६. **शिस्तभंगविषयक प्राधिकारी.**— (१) राज्यपाल कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याला नियम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा करू शकतील.

(२) पोट-नियम (१) च्या तरतुदींना बाधा न आणता, नियुक्ती प्राधिकारी ज्यांची नियुक्ती करण्याचा त्यांना अधिकार आहे व जे त्यांच्या नियंत्रणाखाली आहेत अशा [1][गट-क] व [2][गट-ड] च्या संवर्गातील कर्मचाऱ्यांना नियम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा करू शकतील :

परंतु, कार्यालय प्रमुख, त्यांच्या संबंधित प्रशासकीय नियंत्रणाखालील [1][गट-क] व [2][गट-ड] च्या शासकीय कर्मचाऱ्यांना किरकोळ शिक्षा करण्यासंबंधीच्या अधिकारांचा वापर करतील :

परंतु, आणखी असे की, विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख, त्यांच्या संबंधित प्रशासकीय नियंत्रणाखालील राज्य सेवा [3][गट-ब] च्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या संबंधातच, किरकोळ शिक्षा करण्यासंबंधीच्या अधिकारांचा वापर करतील ;

[1] शा.अ., सा.प्र.वि., क्र. सीडीआर. १००८/प्र.क्र. १५/०८/अकरा, दिनांक १८ जुलै २००८ अन्वये "वर्ग तीन" ऐवजी दाखल करण्यात आले.
[2] वरील अधिसूचनेन्वये "वर्ग चार" ऐवजी दाखल करण्यात आले.
[3] वरील अधिसूचनेन्वये "वर्ग दोन" ऐवजी दाखल करण्यात आले.

उक्त नियमांचे अवलोकन केले असता कार्यालय प्रमुख हे पद गट-ब या पदावर असणाऱ्या अधिकाऱ्यांना स्वतःच्या अखत्यारीत दोषारोप देवू शकत नाही अथवा त्यांचेविरुद्ध शिक्षादेश निर्गमित करू शकत नाही, याबद्दल सुस्पष्टपणे उक्त नियमात तरतूद असल्याचे स्पष्ट होते.

उक्त महाराष्ट्र नागरी (शिस्त व अपील),नियम 1979 मध्ये उल्लेखित नियम एवढे सुस्पष्ट असताना देखील मुंबई मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक श्री अहिरराव साहेब यांनी त्यांच्या अधिकार क्षेत्रात नसतानाही मला संदर्भ-1 प्रमाणे दोषारोपही दिलेले आहे आणि संदर्भ-2 अन्वये मला 3 वर्षे वेतनवाढी स्थगितीची शिक्षा देऊन त्याप्रमाणे शिक्षा आदेशही निर्गमित केलेला आहे. मुंबई मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक श्री अहिरराव साहेब यांनी निर्गमित केलेल्या उक्त संदर्भीय शिक्षा आदेशामुळे नियमांचा भंग होऊन प्रचलित नियमांचे उल्लंघन झाल्याचे अगदी स्पष्ट आहे.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा ( शिस्त व अपील ) नियम,1979 मधील नियम-26 अवलोकनार्थ खालीलप्रमाणे उद्धृत करीत आहे—

२६. **आदेश, नोटिसा, इत्यादींची बजावणी.**— या नियमांन्वये देण्यात येणारा प्रत्येक आदेश, नोटीस आणि इतर आदेशिका या, संबंधित शासकीय कर्मचाऱ्याला व्यक्तिशः देण्यात येतील किंवा त्याच्याकडे नोंदणीकृत डाकेने पाठविण्यात येतील.

मुंबई मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक श्री. अहिरराव सो. यांनी मला संदर्भीय दोषारोपपत्र/कारणे दाखवा नोटीस/शिक्षा आदेश याबाबतचा गोपनीय पत्रव्यवहार सिंधुदुर्ग जिल्हा कारागृह यांचेमार्फत पाठविणे प्रक्रियेनुसार बरोबर असताना त्यांनी मला खालील मार्गाने पाठविलेले आहे—

1. माझ्या G-मेल आयडी अकाऊंट वर दि.27.01.2024 रोजी मुंबई मध्यवर्ती कारागृह यांच्या mumbaicp-mh@gov.in या ई-मेल आयडीद्वारे गोपनीय असलेले संदर्भीय दोषारोपपत्र पाठविण्यात आले. (सदरची ई-मेलची पोच **सहपत्र-4** म्हणून अवलोकनार्थ जोडलेली आहे.)

29

2. मुंबई मध्यवर्ती कारागृहाचे वरिष्ठ तुरुंग अधिकारी यांच्या व्हॉटस अप अकाऊंट असलेल्या भ्रमणध्वनीद्वारे गोपनीय असलेले संदर्भीय दोषारोपपत्र पाठविण्यात आले. (सदर व्हॉटसअप वरील प्राप्त ज्ञापनाचा स्क्रीनशॉट **सहपत्र-5** म्हणून अवलोकनार्थ जोडलेली आहे.)

3. माझ्या मूळ गावी असलेल्या घरच्या पत्त्यावरदेखील दि.12.02.2024 रोजी स्पीड पोस्टने संदर्भीय दोषारोपपत्र पाठविण्यात आले. (सदर टपालाच्या पाकीटाची प्रत **सहपत्र-6** म्हणून अवलोकनार्थ जोडलेली आहे.)

4. दि.16.03.2024 रोजी माझ्या तीन विविध ई-मेल आयडी असलेल्या अकाऊंट वर मुंबई मध्यवर्ती कारागृह यांच्या mumbaicp-mh@gov.in या ई-मेल आयडीद्वारे गोपनीय असलेली जा. क्र. 138/2024 दि. 20.03.2024 रोजीची कारणे दाखवा नोटीशीची प्रत पाठविण्यात आली. (सदरची ई-मेलची पोच **सहपत्र-7** म्हणून अवलोकनार्थ जोडलेली आहे.)

5. दि. 20.03.2024 रोजी माझ्या तीन विविध ई-मेल आयडी असलेल्या अकाऊंट वर मुंबई मध्यवर्ती कारागृह यांच्या mumbaicp-mh@gov.in या ई-मेल आयडीद्वारे गोपनीय असलेली जा. क्र.146/2024 दि. 20.03.2024 रोजीचे पत्र आलेले आहे.(सदरची ईमेलचीपोच **सहपत्र-8** म्हणून अवलोकनार्थ जोडलेली आहे.)

6. माझ्या G-मेल आयडी अकाऊंट वर दि. 13.04.2024 रोजी मुंबई मध्यवर्ती कारागृह यांच्या mumbaicp-mh@gov.in या ई-मेल आयडीद्वारे गोपनीय असलेल्या संदर्भीय शिक्षा आदेशाची प्रत पाठविण्यात आली.

उक्त उल्लेखित पत्रव्यवहारांवरून निम्न 04 बाबी स्पष्ट होतात—

- उक्त सर्व पत्रव्यवहार हा महाराष्ट्र नागरी सेवा ( शिस्त व अपील ) नियम, 1979 मधील नियम-26 मध्य उल्लेखित तरतूदींनुसारच होणे आवश्यक असतानादेखील सदर **नियम क्र. 26 चे सरळ-सरळ उल्लंघन** करण्यात आले असल्याचे स्पष्ट होत आहे.

- उक्त सर्व पत्रव्यवहार मुंबई मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक श्री.अहिरराव सो. यांनी त्यांचेकडील mumbaicp-mh@gov.in या ई-मेलद्वारे केलेला आहे. सदरचा mumbaicp-mh@gov.in ई-मेल आयडी हा गोपनीय पत्र व्यवहार करण्यासाठीचा नसून सदरच्या ई-मेलद्वारे संस्थेचा सर्व ऑनलाइन पत्रव्यवहाराची आवक जावक होत असते. सदर ई-मेल आयडी बरेच वापरकर्ते कर्मचारी वापरत असतात हे अगदी उघड आहे.

**महाराष्ट्र कारागृह नियमावली,1979 मधील प्रकरण क्रमांक-14 STAFF FUNCTIONS-** मधील मा. शासन यांच्या दिनांक 01.12.2015 चे परिपत्रकाअन्वये **Maharashtra Prisons (Staff Functions) (Amendment) Rules, 2015** या दुरुस्तीमधील **नियम-13 मधील उपनियम- (29-a)** कडे मा. महोदयांचा लक्षवेध करणे अत्यावश्यक आहे—

30

**Rule-13** - The Superintendent shall—
**Sub Rule- (29)** to implement State policy pertaining to correctional administration, a Superintendent shall—
**(a) personally keep the custody of secret and confidential documents;**

**उक्त उल्लेखित नियम स्वयंस्पष्ट आहे की गोपनीय कागदपत्रांची संपूर्ण अधिकारिता मा. कारागृह अधीक्षक यांचे ठायी अनुस्यूत आहे.** त्यामुळे उक्त पत्रव्यवहार ज्या माध्यमातून आणि ज्या पद्धतीने केला गेला त्यातून **माझ्या गोपनीयतेच्या अधिकारांचे आणि गोपनीयतेच्या नियमांचे व तत्वांचे उघड-उघड उल्लंघन** झालेले आहे आणि या सर्व कृतीस अधीक्षक म्हणून श्री. अहिरराव साहेब हेच जबाबदार आहेत.

- मा.कारागृह मुख्यालय,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे आदेशाने माझी बदली सिंधुदुर्ग जिल्हा कारागृह या ठिकाणी झालेली होती. त्यामुळे **उक्त सर्व पत्रव्यवहार हा मला अधीक्षक,सिंधुदुर्ग जिल्हा कारागृह यांचेकडून प्राप्त होणे, ही बाब प्रक्रिया आणि नियमाप्रमाणे योग्य होती.** परंतु मुंबई मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक श्री. अहिरराव सो. यांनी वरील चुकीच्या मार्गाने आणि चुकीच्या पद्धतीने पत्रव्यवहार केलेला आहे. परिणामी श्री. अहिरराव साहेब हे कार्यालय प्रमुख म्हणून **कायद्याच्या योग्य प्रक्रियेचे (due process of law) आणि कायद्याने घालून दिलेल्या प्रक्रियेचे (Procedure established by law ) पालन करण्यास अपयशी ठरलेले** आहेत. लोकसेवकांनी कायद्याच्या योग्य प्रक्रियेचे अनुपालन न करणे ही बाब बेशिस्त वर्तन आणि शिस्तभंगाच्या कक्षेत येते.

- उक्त सर्व पत्रव्यवहाराचे अवलोकन केले असता मुंबई मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक श्री.अहिरराव साहेब यांनी मला एकच पत्र मला माझ्या 03-03 वेगवेगळ्या ई-मेल आयडीवर पाठविलेले आहे. पत्रव्यवहाराच्या योग्य मार्गाचा अवलंब न करता श्री.अहिरराव साहेबांनी माझ्यावर दबाव टाकण्यासाठीच द्वेषपूर्ण भावनेतून पत्रव्यवहार केलेला आहे. सदरच्या पत्रव्यवहारावेळी मी मुंबई मध्यवर्ती कारागृह यांचे आस्थापनेवरून सिंधुदुर्ग कारागृहाच्या आस्थापनेवर त्यांच्या आस्थापनेवर कार्यरत नसतानाही व अधीक्षक श्री. अहिरराव सो. यांना त्याबाबत माहिती असतानादेखील व श्री. अहिरराव सो. हे उक्त उल्लेखित महाराष्ट्र नागरी सेवा -शिस्त व अपिल,नियम 1979 मध्ये उल्लेखित **शिस्तभंग विषयक प्राधिकारी नसतानाही त्यांनी 12.02.2024 रोजी मला माझे मूळ गावी जे दोषारोपपत्र पाठविले त्याचप्रमाणे माझ्या पत्नीच्या भायखळा येथील शासकीय निवासस्थानी शिपाई कर्मचारी यांचेकरवी दोषारोपपत्र पाठविले ते कोणत्या अधिकाराखाली पाठविले असा प्रश्न उपस्थित होतो.** यावरून श्री. अहिरराव सो. यांची माझ्याबद्दल असणारी द्वेषभावनाच दिसून येते.

**त्याचप्रमाणे उपरोल्लेखित कारणे दाखवा नोटीशीमध्ये त्यांनी माझे अभिवेदन येण्यापूर्वीच आपणावर 03 वेतनवाढी परिणाम न होता का स्थगित करण्यात येवू नये, याप्रमाणे विचारणा केलेली आहे. यावरून अधीक्षक श्री. अहिरराव साहेब यांनी मला 03 वर्षे वेतनवाढी स्थगितीची शिक्षा देण्याचे अगोदरपासूनच ठरविल्याचे स्पष्ट होते.** यावरून अधीक्षक,मुंबई मध्यवर्ती कारागृह यांचा द्वेषपूर्ण पूर्वग्रहदूषितपणा स्पष्ट होतो.

31

राहता राहिला प्रश्न दोषारोपातील बाबींचा- श्री.अहिरराव सो. यांनी ई-मेलद्वारे पाठविलेल्या दोषारोपामध्ये खालीलप्रमाणे बाबींचा उल्लेख केलेला आहे--

**<u>दोषारोप-1]</u> श्री शिंदे यांनी व्हॉटसअप ग्रुपवर अधीक्षक श्री. भोईटे सो. व इतर साप्ताहिक सुट्टी न देणाऱ्या अधीक्षकांवर अवमानकारक विधान केलेले आहे.**

**स्पष्टीकरण**- सदर माझ्या मेसेजची सुरुवातच **" काहींना.... "** या शब्दापासून झालेली आहे. त्याचप्रमाणे दोषारोपामध्ये उद्धृत केलेल्या माझ्या उक्त **मेसेजमध्ये कुठेही श्री. भोईटे साहेब यांचे नाव घेतलेले नाही.** त्याचप्रमाणे श्री.अहिरराव साहेब यांनी दोषारोपामध्ये उल्लेखित केलेल्या **इतर कोणत्याही अधीक्षक साहेबांच्या नावांचा उल्लेख माझ्या मेसेजमध्ये मी केलेला नाही.** त्याचप्रमाणे उल्लेखनीय बाब ही की, सदरच्या **मेसेजमध्ये मी कुठेही साप्ताहिक सुट्टीबद्दल वक्तव्य केलेले नाही.** सदरच्या मेसेजमध्ये मी केवळ भ्रष्टाचाराबाबत वक्तव्य केलेले आहे. भ्रष्ट माणसाचे मनाचे मनोशास्त्रीय विश्लेषण करून भ्रष्ट प्रवृत्तींवर मी प्रहार केलेला आहे. त्यासाठी मी संत तुकारामांच्या प्रसिद्ध अभंगांच्या ओळींचा आधारदेखील घेतलेला आहे. त्यामुळे " नको, नको मना गुंतू मायाजाळी काळ आला जवळी ग्रासावया, नाशवंत देह .." या अभंग पंक्तीतून मी कोणाही सन्माननीय अधिकारी यांचे नावाचा कसलाही उल्लेख केलेला नाही. यावरून मा.भोईटे साहेब आणि इतर कारागृह अधीक्षकांचा अवमान कसा झाला,याचा उलगडा मलाच काय कोणालाही होण्याची शक्यता नाही.

मा. कारागृह उ. म. नि., द. वि.,मुंबई यांना दिलेल्या जबाबामध्ये मी उक्तप्रमाणेच वस्तुस्थिती नोंदविलेली असतानाही व माझा सदरचा जबाब श्री.अहिरराव यांनी वाचलेला असतानाही मुंबई मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक श्री.अहिरराव साहेब यांना मी अधीक्षक श्री.भोईटे साहेब आणि इतर कारागृह अधीक्षकांचा अवमान केल्याचे दोषारोपात म्हटलेले आहे. श्री.भोईटे साहेब हे कोण आहेत,ते कोणत्या कारागृहाचे अधीक्षक आहेत, याबद्दल मला काहीही माहिती नव्हते. त्याचप्रमाणे दोषारोपामध्ये उल्लेखित इतर कारागृह अधीक्षक नेमके कोण आहेत याबद्दल मला अजूनही माहिती नाही.

श्री.अहिरराव सो. यांनी वैयक्तिक द्वेषापोटी मला सदर प्रकरणी लक्ष्य केलेले असून कदाचित दोषारोपामध्ये उल्लेखित मेसेजमधील वापरलेली भ्रष्टाचारविरोधी मी घेतलेली भूमिका श्री.अहिरराव साहेब यांना रुचली नसावी असे वाटते. आणि त्यामुळेच त्यांनी सदर प्रकरणामध्ये मला पुढे करून मला जाणीवपूर्वक अडकविण्याचा खोटा बनाव रचलेला असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

**<u>दोषारोप 2]</u> श्री शिंदे यांनी दक्षिण विभाग, मुंबई या व्हॉटसअप ग्रुपवर कारागृह प्रशासनावर व वरिष्ठ अधिकारी यांचेविरूद्ध धमकीवजा पोस्ट करून कारागृह अधिकारी,कर्मचारी यांना भडकावण्याचा प्रयत्न केलेला आहे—**

**स्पष्टीकरण**- मी वर नमूद केलयाप्रमाणे कोणत्याही कारागृह अधिकारी, कर्मचारी, कारागृह प्रशासन यांचा उल्लेख माझ्या मेसेजमध्ये कोणत्याही ठिकाणी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष पद्धतीने केलेला नाही. त्याचप्रमाणे दोषारोपामध्ये उल्लेखित व्हॉटस अप मेसेजमूळे कारागृह अधिकारी-कर्मचारी यांनी दंगे करून, जाळपोळ करीत सार्वजनिक सुव्यवस्था भंग केल्याचे ऐकीवात नाही. त्यामुळे अधिकारी-कर्मचारी यांना मी भडकविण्याचा प्रयत्न केला आहे, ही थिअरी माझ्यावर असणाऱ्या द्वेशामूळेच द्वेष बुद्धी ठेऊन श्री. अहिरराव सो यांनी पुढे केली आहे.

त्याचप्रमाणे श्री. अहिरराव साहेब यांनी दक्षिण विभाग, मुंबई या ज्या व्हॉटस ग्रुप चा उल्लेख केलेला आहे त्या ग्रुपवर मी दोषारोप पत्रामध्ये उल्लेखित केलेला मेसेज कधीही लिहिलेला नाही. वस्तुतः

32

मी सदरच्या व्हॉटसअप ग्रुप चा सदस्य यापूर्वी कधीही नव्हतो किंवा तसा असल्याचे मला स्मरत नाही. दोषारोपामध्ये उल्लेखित मेसेज मी इतर कोणत्यातरी कारागृहाशी संबंधित नसलेल्या ग्रुपसाठी लिहिलेला होता. त्या ग्रुपवरून तो मेसेज व्हायरल होऊन तो वरील ग्रुपवर आला असावा,असा माझा अंदाज आहे. कारण सदर मेसेज मी स्वतः लिहिलेला असलयाने मा. डीआयजी सो., दक्षिण विभाग, मुंबई या ठिकाणी दिलेल्या जबाबात सदरचा मेसेज माझा असल्याचा जबाब मी दिलेला आहे. परंतु सदरचा मेसेज हा दक्षिण विभाग,मुंबई या कारागृहीन कर्मचारी यांच्या व्हॉटसअप ग्रुपवरील आहे , हे मला जबाब देताना माहीत नव्हते अथवा सदरचा मेसेज हा दक्षिण विभाग,मुंबई या कारागृह कर्मचाऱ्यांचे व्हॉटसअप ग्रुपवर पोस्ट केलेला होता, याबद्दल मला त्यावेळी मा. डीआयजी कार्यालय,दक्षिण विभाग,मुंबई यांचेकडून माहिती देण्यात आलेली नव्हती. त्याचप्रमाणे माझा जबाब नोंदविताना मी सदर संपूर्ण प्रकरणाचा पत्रव्यवहार वाचायला देण्याची मागणी केली होती. मात्र सदरचा पत्रव्यवहार हा गोपनीय असल्याने तो आपणास वाचावयास देता येत नसल्याचे मा. डीआयजी सो. यांचे कार्यालय, दक्षिण विभाग,मुंबई यांचेकडून त्यावेळी सांगण्यात आले होते. त्यामुळे त्यावेळी मी सदरचा मेसेज माझा असल्याचे मी जबाबात नोंदविले ; मात्र मला त्यावेळी मी लिहिलेल्या माझ्या मूळ मेसेजचे माझ्या अपरोक्ष तंत्रज्ञानाचा गैरवापर करीत स्थानांतरण झाल्याचे त्यावेळी मला माहीत नव्हते. म्हणून त्यावेळी सदरचा मेसेज मी केला असल्याचे मी जबाबात नोंदविलेले होते. परंतु, दोषारोपपत्रातील उल्लेखित केलेला मजकूर मी कधीतरी लिहिलेला असला तरी तो मी दक्षिण विभाग,मुंबई या व्हॉटसअप ग्रुपवर अथवा त्या ग्रुपसाठी लिहिलेला नाही.

सदरचा मजकूर मला कुरीतीने अडकविण्याचे उद्देशाने कुणीतरी पद्धतशीर षडयंत्र रचून मला अडकविण्याचे कुभावना मनाशी बाळगून माझ्याविरुद्ध कट-कारस्थान केलेले आहे आणि त्याच व्यक्तीने सदर मेसेज दक्षिण विभाग, मुंबई या ग्रुपवर माझ्या मोबाइल क्र. सेव करून पोस्ट केलेला असल्याचे स्पष्ट होते.

मला कोणत्यातरी प्रकरणामध्ये येन-केन प्रकारे अडकविण्याचा चंग श्री.अहिरराव साहेब यांनी बांधल्याचे सप्टेंबर-2023 पासूनच बांधलेला होता. त्यामध्ये प्रामुख्याने वाधवान प्रकरणातील अधीक्षक श्री.अहिरराव सो यांची निष्क्रियता मी डिकोड केल्याने त्यांना त्यावेळी वाईट वाटले होते. या प्रकरणापासून विविध किरकोळ प्रकरणांत मेमो देणे, कारवाईची धमकी देणे याप्रकारे त्रास देण्याचे प्रकार मा.अधीक्षकांनी सुरू केले होते. परंतु मी कोणाच्या पाच पैशाला मिंधा नसलेला सरळ काम करणारा असल्याने सदरच्या संदर्भीय प्रकरणामध्ये अधिकारकक्षा नसतानाही मला जाणून-बुजून हेतुपूरस्सरपणे गोवण्यात आलेले आहे. सदर व्हॉटसअप ग्रुपवरील मेसेज हा उक्त सर्व कटाचा एक भागच होता असे म्हणता येईल. श्री. अहिरराव सो. यांचे आदेशाने त्यांचे जवळील कर्मचारी यांचे मदतीने दक्षिण विभाग,मुंबई या व्हॉटसअप ग्रुपवर माझा मोबाइल क्र. टाकून प्लांट केला असण्याची दाट शक्यता आहे आणि त्याच कर्मचाऱ्याचे माध्यमातून स्क्रीनशॉट काढून मला त्यामध्ये जाणीवपूर्वक गोवल्याचा संशय घ्यायला जागा आहे.

अधीक्षक श्री. अहिरराव सो. यांनी मला कोणत्या ना कोणत्या प्रकरणांत अडकविण्याचा अनेकदा विफल प्रयत्न केलेला आहे. मात्र मी सरळ काम करणारा प्रामाणिक अधिकारी असल्याने अधीक्षक श्री. अहिरराव सो. यांचे माझ्याविरुद्ध कारवाया करण्याचे सर्व मनसुबे धुळीस मिळालेले होते. त्यामुळे ते अस्थिर झालेले होते. त्यांनी शिंदे हटाव ही मोहिमच उघडलेली होती. श्री.अहिरराव सो. यांचा माझ्याविरुद्धचा आक्रमक पवित्रा एव्हाना इतर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना माहिती झाल्याने त्यांचेवर त्यांना विरोधात जाणाऱ्या अधिकाऱ्यांची ते काय अवस्था करतात आणि ते कसे कारवाई करणारे अधिकारी म्हणून सुप्रसिद्ध आहेत, याप्रमाणे प्रतिमा मेंटेन करण्याचे बर्डन त्यांचेवर होते, हे स्पष्ट दिसत होते.

33

म्हणूनच, श्री.अहिरराव सो. यांनी संदर्भीय दोषारोपातील व्हॉटसअप मेसेज दक्षिण विभाग, मुंबई या ग्रुपवर पोस्ट केलेला नसतानाही तो मीच पोस्ट केल्याचा बनाव रचलेला आहे. सदर मेसेजच्या मजकुरामध्ये कोणत्याही कारागृह अधीक्षकांचा, साप्ताहिक सुट्टीचा, कारागृह प्रशासनाचा मी कसलाही उल्लेख प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष पद्धतीने केलेला नाही अथवा कोणत्याही कारागृह अधिकारी,कर्मचारी यांच्या भावना भडकतील याप्रमाणे भाष्य केलेले नाही. परंतु तरीही अधीक्षक श्री.अहिरराव साहेब यांनी चुकीच्या पद्धतीने थिअरी तयार करून व सदर मेसेजचे भांडवल करून उक्त सर्व कारणांमुळे माझ्याविषयी दुष्ट भावना मनात ठेऊन केवळ सूड-बुद्धी ठेऊन माझा सदर प्रकरणाशी कसलाही संबंध नसताना मला सदर प्रकरणी ओढून-ताणून जाणीवपूर्वक अडकविलेले आहे. त्याचप्रमाणे माझ्या विरुद्ध कारवाई करण्याची त्यांची तीव्र उत्कंठेमुळेच आणि माझ्यावरील अपार द्वेष भावनेपोटीच ते स्वतःचे तार्किक संतुलन हरवून बसले आणि त्यांच्या अधिकारकक्षेत नसलेल्या कृती त्यांनी केलेल्या आहेत —

1. **महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम,1979 मधील नियम -6 (2) चा भंग—**
   शिक्षा प्राधिकारी नसतानादेखील त्यानी माझा 03 वर्षे वेतन स्थगितीचा शिक्षा आदेश निर्गमित करून उक्त नियमांचा सरळ सरळ भंग केलेला आहे.

2. **महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम,1979 मधील नियम 26 चा भंग—**
   दोषारोप पत्र, कारणे दाखवा नोटीस, तत्संबंधी इतर कागदपत्रे आणि शिक्षा आदेश यासारखी संवेदनशील गोपनीय कागदपत्रे केवळ व्यक्तिशः अथवा टपालाने या दोन माध्यामातून देणे या नियमाने बंधनकारक असल्याची स्पष्ट तरतूद असतानाही सदरची संवेदनशील आणि गोपनीय कागदपत्रे मला ई-मेलद्वारे आणि व्हॉटसअप द्वारे पाठवून उक्त प्रक्रियेचा श्री. अहिरराव सो. यांनी सरळ-सरळ भंग केलेला आहे.

3. **महाराष्ट्र कारागृह नियमावली,1979 मधील प्रकरण क्रमांक-14 STAFF FUNCTIONS मधील नियम 13 उपनियम (29-a) चा भंग—**
   **Rule-13 - The Superintendent shall— (29-a) personally keep the custody of secret and confidential documents;**
   याप्रमाणे अधीक्षक या पदाची जबाबदारी असताना सुद्धा अधीक्षक श्री.अहिरराव सो. यांनी त्यांचे कायदेशीर हवालातीत असलेली माझ्याबद्दलची गोपनीय कागदपत्रे सर्वसामान्य पत्रव्यवहारासाठी असलेल्या ई-मेलवर अपलोड करून सदरचे ई-मेल हाताळणाऱ्या सर्वांना वाचण्यासाठी बहु-हस्ती (Multi-hands) देऊन खुली केलेली आहेत. त्याचप्रमाणे मला दिलेले संदर्भीय दोषारोप तर वरिष्ठ तुरुंगाधिकारी यांचे व्हॉटसअप वरुन मला प्राप्त झालेले आहे. वास्तविक पाहता वरिष्ठ तुरुंग अधिकारी या पदाचा आणि गोपनीय विभागाचा आपापसांत काहीही संबंध नसताना देखील अधीक्षक श्री.अहिरराव सो. यांनी सदरचे गोपनीय असलेले दोषारोप पत्र चुकीच्या पद्धतीने वरिष्ठ तुरुंग अधिकारी यांना उपलब्ध करून दिल्याचे सुस्पष्ट होत आहे. परिणामस्वरूप उक्त महाराष्ट्र कारागृह नियमावलीच्या उक्त तरतूदीचा भंग झालेला असून गोपनीयतेची तत्वे देखील पायंदळी तुडवली गेली आहेत.

4. **" Due process of law "** and **" Procedure established by law "** ( **मेनका गांधी वि. यूनियन ऑफ इंडिया SC- Interpretation of Article-21 of the constitution of India) या तत्वांचा भंग—**

34

- उक्त अनुक्रमांक-2 मध्ये उल्लेखित **महाराष्ट्र नागरी (शिस्त व अपील),1979 नियम-6 (2), नियम-26 अंतर्गत असलेल्या तरतूदीमधील उल्लेखित प्रक्रियांचे पालन केले गेलेले नाही.**
- त्याचप्रमाणे उक्त अ. क्र. 3 मध्ये उल्लेखित **महाराष्ट्र कारागृह नियमावली,1979** मधील प्रकरण क्रमांक-14 STAFF FUNCTIONS मधील नियम **13 उपनियम (29-a) मधील उल्लेखित गोपनीयतेच्या तत्वाबद्दलची प्रक्रिया पालन करण्यात कारागृह अधीक्षकांनी कसूर केलेली आहे.**
- मा. कारागृह मुख्यालय, पुणे यांचेकडील दिनांक 11.01.2023 रोजीच्या आदेशानुसार माझी बदली सिंधुदुर्ग जिल्हा कारागृह या ठिकाणी झालेली असून प्रक्रियेनुसार मुंबई मध्यवर्ती कारागृह यांनी त्यांचा दोषारोप ते शिक्षादेश व तत्संबंधी सर्व पत्रव्यवहार सिंधुदुर्ग जिल्हा कारागृह यांचे माध्यमातून होणे प्रक्रियेनुसार आवश्यक होते. परंतु तसे काहीही न करता मुंबई मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक यांनी उक्त उल्लेखित केल्याप्रमाणे माझा त्यांच्या आस्थापनेशी संबंध नसतानाही केवळ माझ्यावर थेटपणे दबाव टाकण्यासाठीच प्रक्रियांचे उल्लंघन करून मला थेट पत्रव्यवहार केला गेलेला आहे.

5. **भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद-21 अंतर्गत असलेल्या राइट टू प्रायवसी या अधिकाराचा भंग- (K.S. Puttaswamy vs Union of India case)**
   उक्त सर्व गोपनीय कागदपत्रे योग्य प्रक्रियेने जबाबदारीने हाताळणे आवश्यक असताना ती चुकीच्या पद्धतीने हाताळल्याने माझ्या गोपनीयतेचा भंग झालेला असून त्यामुळे माझ्या खाजगीपणाच्या मूलभूत अधिकारांचा भंग झालेला आहे.

6. उक्त संदर्भीय प्रकरणी चौकशी मा. कारागृह उपमहानिरीक्षक, दक्षिण विभाग,मुंबई यांनी केलेली असतानाही सदर प्रकरणी दोषारोप आणि शिक्षादेश मुंबई मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक श्री.अहिरराव सो यांनी त्यांना अधिकार नसतानाही निर्गमित केलेला आहे, हे स्पष्ट आहे. त्यामुळे अधिकारकक्षेचे त्यांनी उल्लंघन केलेलेआहे.

7. संदर्भीय प्रकरणी शिक्षा आदेशामध्ये साप्ताहिक सुट्टी न दिल्याने वेगवेगळ्या माननीय कारागृह अधीक्षकांचा आणि अन्य एका कारागृहाचे अधीक्षकांचा व्हॉटस अप वर अवमान झाल्याचे श्री. अहिरराव सो. यांनी शिक्षा आदेश व दोषारोपामध्ये नमूद केलेले आहे. कारागृह अधीक्षकांचा अवमान हा पूर्ण महाराष्ट्र प्रादेशिकतेचा मुद्दा असल्याने सदरबाबत अधिकारक्षेत्र मा. कारागृह मुख्यालय,पुणे यांच्याकडे निर्विवादपणे असणे अगदी स्वाभाविक आहे. परंतु सदर प्रकरणी त्यामध्ये श्री.अहिरराव सो यांच्यासारख्या अधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यानेjurisdiction ओलांडून हस्तक्षेप करणे, ही बाब त्यांचे स्थानिक हितसंबंधाचे दृष्टीने अंगुलीनिर्देश करते, हे अगदी स्पष्टपणे दिसते.

**8. संदर्भीय प्रकरणी केवळ द्वेष व सूड बुद्धी ठेऊन श्री.अहिरराव साहेब यांनी प्रचलित नियम,प्रक्रिया,प्रचलने,नैसर्गिक न्याय,सारासार विवेकबुद्धी इत्यादी महत्वपूर्ण बाबींचे पालन करणे योग्य असतानाही त्यांचे पालन न करता भंग केल्याचे स्पष्ट होते.**

35

9. **नियमभंग हा शिस्तभंगच असतो;** परंतु असा भंग करण्याचे मोरल कोठून येते?श्री.अहिरराव सो. हे मागील सुमारे 10 वर्षांपासून दक्षिण विभागात कार्यरत आहेत.त्यातील 03 वेळा ते मुंबई मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक राहिलेले आहेत. आता तर ते पदोन्नती घेऊन मुंबई मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक म्हणून स्थानापन्न झालेले आहेत, त्यामुळे ते आता दादागिरीची भाषा बोलू लागले आहेत. त्यामुळे माझ्यासारखे वास्तवावर बोट ठेवणाऱ्या आणि कोणाच्याही पांच पैशाला मिंधा नसणाऱ्या अधिकाऱ्याची त्यांना अडचण होते, हे अगदी स्पष्ट आहे. श्री.अहिरराव सो. यांना मी मुंबई मध्यवर्ती कारागृह या ठिकाणी नको आहे. त्यामुळेच त्यांनी त्यांच्या वजनाचा वापर करून माझी सिंधुदुर्ग या ठिकाणी मध्यावधी बदली घडवून आणून उक्त संदर्भीय शिक्षादेश निर्गमित केलेला आहे, ही बाब स्पष्ट होते.

10. महोदय, मी पोलिस प्रशासन आणि कारागृह प्रशासन या ठिकाणी मिळून सुमारे 15 वर्षे इमाने-इतबारे सेवा बजावलेली आहे. मी माझ्या आजवरच्या सेवांकालात कधीही चुकीच्या गोष्टी, भ्रष्टाचार अशा गोष्टी केलेल्या नाहीत. तरी मला न्याय मिळावा,ही विनंती.

**<u>Therefore Pray—</u>**

1. **उक्त सर्व अभिवेदनाचा साकल्याने आणि संवेदनशीलतेने विचार होऊन अयोग्य आणि अवास्तवावर आधारलेला संदर्भीय शिक्षादेश खारीज होणेबावत नम्र विनंती आहे.**

2. **त्याचप्रमाणे सदर प्रकरणाचे अनुषंगाने मला सुयोग्य, उपकारक असणारा योग्य आदेश निर्गमित होणेबाबत नम्र विनंती आहे.**

आपला विश्वासू

[signature]

पांडुरंग सदाशिव शिंदे
तुरुंग अधिकारी श्रेणी-2
मुंबई मध्यवर्ती कारागृह,
मुंबई-11.

अतिरिक्त प्रत माहितीसाठी सविनय सादर —

प्रति,

मा. अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य,
पुणे-1.